# जाहिर सुचना

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मा. विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई येथील मा. सहाय्यक आयुक्त (मावक), मा. विभागीय आयुक्त कार्यालय, दुसरा मजला, रुम नंबर २२७, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडील खाली नमुद केलेले वाहन निर्लेखित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदर वाहन खरेदी करु इच्छिणा-या व्यक्ती अगर संस्थेकडून ज्या किंमतीला वाहन खरेदी करु इच्छिता त्या किंमतीच्या मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मोटार वाहन क्रमांक | प्रकार |
|---|---|---|
| १ | MH 04 Q 2996 | MAHINDRA कमांडर 750 DP 2/4 WDHG |

## निविदा संदर्भात नियम व अटी

१. सदरचे वाहन विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई येथील वाहनतळात उभे केलेले आहे. सदरचे वाहन **"जसे आहे तसे"** /**"आहे त्या स्थितीत"**या तत्वावर वाहन खरेदी करणेस इच्छुक व्यक्तींकडून मोहरबंद देकार मागविणेत येत आहेत.

२. मोहोरबंद निविदा दि. २७/१२/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मा. सहाय्यक आयुक्त (मावक), मा. विभागीय आयुक्त कार्यालय, दुसरा मजला, रुम नंबर २२७, कोकण विभाग, कोकण भवन,नवी मुंबई येथे समक्ष आणून द्यावेत. उशिरा आलेले देकार स्विकारले जाणार नाहीत.

३. या शाखेचे आहरण व संवितरण अधिकारी हे तहसिलदार (सामान्य), कोकण विभाग हे असल्याने मोहोरबंद निविदा अर्जासोबत निविदाधारकांनी/ इच्छुकांनी सीलबंद लिफाफ्यात **तहसिलदार (सामान्य), कोकण विभाग** यांचे नावे **इसा-याची अनामत रक्कम रु. ५०००/-** इतक्या रकमेचा धनादेश जोडावा. सदर निविदामध्ये इच्छुक निविदाधारक/खरेदीदार यांनी सदरचे वाहन आपण किती रकमेत खरेदी करण्यास इच्छुक आहेत ती रक्कम नमूद करावी. त्यावर मोटार वाहन विक्रीसाठी निविदा असा स्पष्ट उल्लेख असावा.

४. इसा-याच्या रकमेचा धनादेश निविदेसोबत नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

५. दिनांक २८/ १२/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व सीलबंद लिफाफे त्यावेळी उपस्थित असतील त्यांचेसमोर उघडले जातील.

६. निविदा उघडण्याच्यावेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल.

७. ज्या इच्छुकाने सर्वात जास्त किंमतीस सदरचे वाहन खरेदी करण्यास तयार असल्याबाबत देकारामध्ये नमूद केले असेल त्याला सदरचे वाहन विक्री करणेत येईल.

८. यशस्वी निविदाधारकास रोख रक्कम भरुन एक आठवडयात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व इसा-याच्या रकमेस त्यास मुकावे लागेल.

९. यशस्वी निविदाधारकास वाहनावरील आवश्यक तो कर भरावा लागेल किंवा मोटार वाहनाचा प्रत्यक्ष ताबा मिळण्यापूर्वी त्याबाबतचा लेखी पुरावा सादर करावा लागेल.

१०. यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसा-याची रक्कम जप्त करण्यात येईल.

११. उप आयुक्त (सामान्य), कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई हे कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा फेटाळू शकतील.

१२. सदर मोटार वाहन, वाहतुक, हस्तांतरण, नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी धारकास स्वखर्चाने करावी लागेल.

१३. प्रशासकीय किंवा तांत्रिक कारणास्तव वरील निविदा सादर करावयाच्या किंवा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो.

**ठिकाण:-कोकण भवन, नवी मुंबई**
**दिनांक- १३/१२/२०१७**

(भाऊसाहेब फटांगरे) 13.12
**सहाय्यक आयुक्त (भूसंपादन),कोकण विभाग तथा**
**सहाय्यक आयुक्त (मावक) कोकण विभाग**